जलस्वराज्य -२ कार्यक्रम.

५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या टंचाईग्रस्त गावे/ वाड्यांसाठी पाऊस पाणी साठवण व्यवस्था निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०२/प्र.क्र.५६/पापु-११

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
नविन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०००01.
तारीख: ०१ फ़ेब्रुवारी २०१६

वाचा §

1) **शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०२/प्र.क्र. ५६/पापु-११, दि. ०४/०३/२०१६**
2) **शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००९/प्र.क्र.२०४/पापु-१५ दि. ०९/०९/२००९**

प्रस्तावना §

राज्यामध्ये लोकसहभागातून आणि मागणी आधारित तत्वावर जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून या कार्यक्रमाचा कालावधी कार्यक्रम सुरु झाल्यापासून ६ वर्षाचा आहे. ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या टंचाईग्रस्त गावे/ वाड्यांसाठी पाऊस पाणी साठवण व्यवस्था निर्माण करणेबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ द्वारे मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेत आल्या आहेत. या अनुषंगाने आजवर झालेल्या कामांच्या आढाव्यात सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व अंमल बजावणी बाबत आढळून आलेल्या त्रुटींमुळे या संदर्भीय शासन निर्णयात सुधारणा व नविन बाबींचा समावेश करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शुध्दिपत्रक

शासन निर्णय क्र. जस्वप्र-०२/प्र.क्र. - ५६/पापु-११, दि. ०४/०३/२०१४ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा आणी नविन बाबींचा समावेश करण्यात येत आहेत.

#१

३. सविस्तर प्रकल्प अहवाल

३.१ निवडण्यात आलेल्या गावे/ वाडयांमध्ये दरडोई दर दिवशी २० लीटर्स प्रमाणे साधारणत: ९० दिवसांच्या कमाल टंचाई कालावधीसाठी पर्यायी पाणी पुरवठा व्यवस्था करणे असे योजनेचे स्वरुप राहील.

या ऐवजी

३.१ सविस्तर प्रकल्प अहवाल

३.१.१ निवडण्यात आलेल्या गावे/ वाडयांमध्ये दरडोई दर दिवशी कमाल २० लीटर्स पर्यंतच्या मर्यादेत साधारणत: ९० दिवसां पर्यंतच्या टंचाई कालावधीसाठी पर्यायी पाणी पुरवठा व्यवस्था करणे असे योजनेचे स्वरुप राहील. तथापी, अपवादात्मक स्थितीत आणी स्थळ सापेक्ष बाबिंचा विचार करुन टंचाई कालावधीमध्ये आणखी ३० दिवसांनी वाढ करता येऊ शकेल.

३.१.२ सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची जबाबदारी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची (भूसवियं) असेल. प्रकल्पातील १२ जिल्हयातील वरिष्ठ भू-वैज्ञानिक कार्यालये सदर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर करतील.

३.१.३ सविस्तर प्रकल्प अहवालातील उपाय योजनांची संकल्पचित्र, अंदाजपत्रके (Design & Estimates) व अनुषंगीक माहिती इत्यादी, कार्यकारी अभियंता, ग्रापापु (जिल्हा परिषद) यांनी वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूसवियं यांना तयार करुन द्यावेत.

३.१.४ सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी क्षेत्रीय सर्वेक्षण, डेटा / माहिती संकलन व अहवाल तयार करण्यासाठी जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूसवियं यांनी त्यांच्याकडील संसाधनांचा व मनुष्यबळाचा वापर करावयाचा आहे (वाहने, सर्व भू-वैज्ञानिक इत्यादी). आवश्यकता आणी उपलब्धतेनुसार या उपांगासाठी जिल्हा परिषदेकडील भू-वैज्ञानिक व इतर संसाधनांचा देखील वापर करावयाचा आहे. भुजल सर्वेक्षण आणी विकास यंत्रणेद्वारे या उपांगासाठी वाहनांच्या इंधनासाठी, सर्वेक्षणा साठी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणारा खर्च जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत रु. २५०००/- प्रतीगाव च्या मर्यादेत उपलब्ध अनुदानातुन करणेत यावा. झालेल्या खर्चाची मागणी टंचाईग्रस्त गावे / वाडी-वस्त्यांकरिता उपाय योजना या अंतर्गत सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष यांचे कडे संचालक, भुसवियं यांचे मार्फत करणेत यावी.

३.१.५ सविस्तर प्रकल्प अहवालात तीन प्रमुख बाबी समाविष्ट असाव्यात

अ) टंचाई कालावधीत गावास/ वाडी वस्तीस निकषानुसार पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राबवावयाची मुळ उपाय योजना (शासन निर्णय क्र. जस्वप्र-०२/प्र.क्र. - ५६/पापु-११, दि. ०४/०३/२०१४ मधील मुद्दा क्र. ३.२ व या शुध्दिपत्रकातील अनुषंगीक सुधारणा)

ब) टंचाई कालावधी व्यतिरिक्त उर्वरित महिन्यांसाठी अस्तित्वात असलेल्या उपाय योजनेच्या शाश्वततेसाठी बळकटीकरण (आवश्यक असल्यासच). तथापी अशा योजना ह्या उपरोक्त मूळ योजनेस पुरक असुन त्याची कींमत मुळ योजनेच्या किमतिच्या २०% परंतु कमाल रु. ५ लक्ष प्रती गाव/वाडी-वस्ती पेक्षा जास्त असता कामा नये.

क) वितरण व सुरक्षीतता यांचे नियोजन, व्यवस्थापन आणि देखभाल दुरुस्ती बाबतच्या तरतूदी.

३.१.६ सविस्तर प्रकल्प अहवालाबाबतच्या विस्तृत मार्गदर्शक सुचना संचालक, भूसवियं यांनी शासनाच्या सहमतीने निर्गमीत कराव्यात.

#२

३.२.१ अस्तीत्वातील स्त्रोतांचे पाऊस पाणी संकलनाद्वारे बळकटीकरण करणे.

या ऐवजी

३.२.१ अस्तीत्वातील स्त्रोतांचे पारंपारिक आणि अपारंपारिक उपाय योजनांद्वारे / पाऊस पाणी संकलनाद्वारे बळकटीकरण करणे.

३.२.७ टंचाईग्रस्त भागांसाठी सध्या राज्य, देश आणी अंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक अभिनव, नावीन्यपूर्ण आणि कॉस्ट ईफ़ेक्टिव उपक्रम राबविले जात आहेत. असे नाविन्यपूर्ण उपक्रम स्थळ सापेक्ष बाबींचा विचार करून राबविण्यात यावेत.

३.२.८ स्थळ सापेक्ष बाबींचा विचार करुन आवश्यकता असल्यास एका गावास / वाडी-वस्तीस एकापेक्षा अधीक उपाय योजना प्रचलीत कींमतीच्या निकषांच्या (Cost Norms) अधीन राहुन संयुक्तपणे राबविता येऊ शकतील (Integrated Approach).

#३

४.१ सविस्तर प्रकल्प अहवालांना प्रथम तांत्रिक व नंतर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी.

या ऐवजी

४.१ जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांनी, तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल, जिल्हा तांत्रिक समितीच्या व कार्यक्रम समन्वय समितीच्या शिफारशीसह, संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना सादर करावेत. संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेस्तरावरील खाली नमुद केल्या प्रमाणेच्या अतिरिक्त संचालक यांचे अध्यक्षतेखालील तपासणी समितीने प्राप्त सविस्तर प्रकल्प अहवाल योग्य असल्याची खात्री करून संचालक, भूसवियं, पुणे यांच्या अनुमतीने तत्वतः मान्यतेंती तांत्रिक व नंतर प्रशासकीय मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांना पाठवावेत.

तपासणी समिती

१) अतिरिक्त संचालक, भू. स. वि. यं., पूणे	अध्यक्ष
२) सहसंचालक (२), भू. स. वि. यं., पूणे	सदस्य
३) अधिक्षक अभियंता, विसंक, सु.स.प्र.व्य. कक्ष, बेलापुर	सदस्य
४) कार्यकारी अभियंता, विसंक, सु. स. प्र. व्य. कक्ष, बेलापुर	सदस्य
५) उपसंचालक, विसंक, संचालनालय, भू. स. वि. यं., पुणे	सदस्य सचिव
६) कार्यकारि अभियंता, ग्रापापु, जिल्हा परिषद (सबंधीत जिल्हा)-निमंत्रित सदस्य	

#४

५.१ शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार ई-निविदा प्रक्रियेद्वारे नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी-१ प्रकारच्या निविदा मागवून कामाची अंमलबजावणी जिल्हा परिषद यांनी करावी.

या ऐवजी

५.१ शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार ई-निविदा प्रक्रियेद्वारे नोंदणीकृत ठेकेदारांकडून बी-१ प्रकारच्या निविदा मागवून कामाची अंमलबजावणी कार्यकारि अभियंता, ग्रापापु, जिल्हा परिषद यांचे द्वारे करणेत यावी. त्यापेकी मुद्दा क्र. ३.२.१ मधील स्त्रोत बळकटीकरण उपाययोजनांची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००९/प्र.क्र.२०४/पापु-१५ दि. ०९/०९/२००९ नुसार करण्यात यावी.

असे वाचावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201602011746242228 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUCHESH RAJBAHADUR JAIVANSHI

Digitally signed by RUCHESH RAJBAHADUR JAIVANSHI
DN: c=IN, o=Personal, postalCode=444505, st=Maharashtra, cn=RUCHESH RAJBAHADUR JAIVANSHI
Date: 2016.02.01 18:01:54 +05'30'

रुचेश जयवंशी
उप सचिव तथा प्रकल्प संचालक

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-२६.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. राज्यमंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मा. विधानसभा विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई-३२.

९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय तथा सदस्य, शक्ती प्रदान समिती.
१०. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय तथा अध्यक्ष शक्ती प्रदान समिती.
११. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय तथा सदस्य, शक्ती प्रदान समिती.
१२. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय तथा विशेष निमंत्रित, शक्ती प्रदान समिती.
१३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय तथा सदस्य शक्ती प्रदान समिती.
१४. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय तथा सदस्य शक्ती प्रदान समिती.
१५. प्रधान सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय तथा सदस्य शक्ती प्रदान समिती.
१६. सर्व विभागीय आयुक्त,
१७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
१९. महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परिक्षालेखा व अनुज्ञेयता)
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षालेखा व अनुज्ञेयता)
२१. सर्व जिल्हाधिकारी.
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२३. सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२४. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई.
२५. अतिरिक्त संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई.
२६. विशेष संनियंत्रण कक्ष (जलस्वराज्य-२), म.जी.प्रा., भू.स.वि.यं. आणि सार्वजनिक आरोग्य विभाग.
२७. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२८. उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व).
२९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
३०. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
३१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).

३२. सर्व प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.

३३. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

३४. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,

३५. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,

३६. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता) जिल्हा परिषद

३७. सर्व गटविकास अधिकारी पंचायत समिती.

३८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.

३९. मंत्रालयातील सर्व विभाग,

४०. निवड नस्ती, पापु-११.